MHND100004982026

**(निशाणी क्र.१ वरील आदेश**
(दिनांक ०९ माहे जूलै, सन २०२६ रोजी पारीत)

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम viii नियम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केला.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र. २ ते ७ हे आपआपसात सख्खे भाऊ बहीण आहेत व अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ ते ६ यांची आई आहे. अर्जदार क्र. १ चे पती व २ ते ७ चे वडील नामे गुणाजी पि. खंडू वाघमारे हे दिनांक १५/०७/२०११ रोजी मौ. अंबूलगा ता. कंधार जि. नांदेड येथे मयत झाले आहेत. मयताचे आई केराबाई व वडील खंडू मरीबा वाघमारे हे देखील यापूर्वीच मयत झाले आहेत. अर्जदारां व्यतिरिक्त मयत गुणाजी पि. खंडू वाघमारे यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना विविध शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मे. कोर्टात सादर केलेला आहे.

३. बॉम्बे रेग्युलेशन १९२७ चे नियम २ नुसार वारस प्रमाणपत्र देतांना अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. सदर बॉम्बे रेग्युलेशनचे वाचन केल्यानंतर मी निष्कर्षास आलो आहे की, सदर नियमाअंतर्गत वारस प्रमाणपत्र देणे

म्हणजे वारस, इच्छापत्र व व्यवस्थापक इत्यादींना औपचारिक मान्यता देणे होय.

**४.** अर्जदारांनी त्यांच्या कथनाचे समर्थनार्थ मयत गुणाजी पि. खंडू वाघमारे यांचे मृत्यू प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत (निशाणी क्रं. १२),मयत गुणाजी पि. खंडू वाघमारे यांचे मतदानकार्ड पडताळणी केलेली प्रत (निशाणी क्रं. १३) अर्जदार क्र. १ ते ७ यांचे आधारकार्डची पडताळणी केलेल्या प्रती (निशाणी क्रं. १४ ते २०) व दि. २९/०४/२०२६ रोजीच्या 'दैनिक श्रमीक एकजूट' वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेली जाहीर नोटीसची मुळ प्रत (निशाणी क्रं. १५) इत्यादी अभिलेखावर दाखल केलेले आहे.

**५.** अर्जदार क्र. ३ नामे गौतम पि. गूणाजी वाघमारे यांनी त्याचे पुरावा शपथपत्र (निशाणी क्रं.११)अभिलेखावर दाखल केले असून त्यांचा पुरावा अबाधित आहे. सदर प्रकरणामध्ये 'दैनिक श्रमीक एकजूट' या स्थानिक परिसरात प्रकाशीत होणा–या वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रगटन (निशाणी क्रं.२१) प्रकाशित करण्यात आले आणि पर्याप्त काळासाठी आक्षेपांची वाट पाहिली परंतु कोणताही आक्षेप आला नाही. सबब अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्जदारांचा अर्ज मान्य करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १. अंजनाबाई भ्र. गुणाजी वाघमारे, २. धम्मदिप पि. गुणाजी वाघमारे, ३. गौतम पि. गूणाजी वाघमारे, ४. मिनाताई पि. गुणाजी वाघमारे, ५. पंचशिला भ्र. गौतम वाघमारे, ६.त्रीशला भ्र.

गंगाधर लोहबंडे, ७. संघमित्रा भ्र. विठठल वाघमारे हे मयत गुणाजी पि. खंडू वाघमारे यांचे वारस आहेत.

३. अर्जदाराने आवश्यक न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे.

KUNDLIK SUDHAKAR KHANDARE

Digitally signed by KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Date: 2026.07.09 16:00:50 +0530

(के. एस. खंडारे)

दि.०९.०७.२०२६

सह दिवाणी न्यायाधीश
(क.स्तर), कंधार